यांनी सांगितले.

# सहाव्या लोणावळा जागतिक चित्रपट महोत्सवाचे आयोजन

**पुणे** : सहाव्या लोणावळा जागतिक चित्रपट महोत्सव 'लिफ्फी २०२१' चे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव येत्या १० ऑक्टोबरपर्यंत रोज सायंकाळी ६ वाजता ऑनलाइन असणार आहे. या महोत्सवात ख्यातकीर्त सिनेनिर्माता शक्ती सामंता यांना श्रद्धांजली वाहिली जाणार आहे. तसेच त्यांची काही संस्मरणीय चित्रपट प्रदर्शितही केले जातील. महोत्सवाच्या संचालनाची जबाबदारी माधव तोडी यांच्याकडे आहे आणि महोत्सवाचे कार्यक्रम प्रमुख म्हणून विवेक वासवानी भूमिका बजावतील.

चित्रपटाविषयी चर्चासत्र होणार आहे. त्यात आशिम सामंता, संदिप सोपारकर, पूजा देसाई, ब्रह्मानंद सिंह, ज्योतीन गोयल, तुषार भाटिया, दिव्य सोलगमा आदीं सहभागी होणार आहेत. रोज एक चित्रपट प्रदर्शित केला जाईल. ऑनलाइन महोत्सवामुळे प्रेषकांना घरातच बसून चित्रपट पाहता येतील. चर्चांमध्येही सहभागी होता येईल. www.onelink.to/plexigo येथून ॲप डाऊनलोड करावे लागेल. चित्रपट महोत्सवासंबंधी अधिक माहिती https://www.facebook.com/LIFFIlansia येथून मिळविता येईल. शक्ती सामंता यांना आदरांजलीचा भाग म्हणून, महोत्सवाचा पहिला आठवडा शम्मी कपूर स्पेशल असेल आणि त्यांचे सदाबहार चित्रपट: ॲंन इव्हनिंग इन पॅरिस, काश्मीर की कली आणि चायना टाउन दाखवले जातील. दुसरा आठवड्यात तुम्हाला राजेश खन्ना यांच्या रोमॅंटिक सिनेप्रवासामध्ये घेऊन जाईल आणि आराधना, कटी पतंग आणि अमर प्रेम हे चित्रपट प्रेषकांना पाहता येतील.